तात्काळ

# महाराष्ट्र शासन

क्र. टिईएम २०१०/(१८७/१०)/तांशि-४,
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २८ जुलै, २०१०.

प्रति,
संचालक (तंत्रशिक्षण),
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : **सामाजिक मागास विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची आकारणी न करण्याबाबत..**

खाजगी विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांत शिकणा-या अनुसूचित जाती, अनुसूचित जामाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या सामाजिक घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून लागू केली आहे. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २००७-०८, २००८-०९ व २००९-१० मध्ये पुढे चालू ठेवण्यात आलेली आहे. चालू वर्षी योजनेबाबतचा शासन निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.

२. या संदर्भात शासनामार्फत अंतिम निर्णय होण्यास काही अवधी लागणार असून दरम्यान व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असल्याने या व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेश घेणा-या सामाजिक मागास विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काची आकारणी संस्थांनी करु नये. या संदर्भात संबंधित संस्थांना तशा सूचना देण्याची कार्यवाही संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण यांनी करावी. तसे संबंधित विभागीय सहसंचालकांना प्र. सहसंचालकांनी तात्काळ कळवावे.

(म. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन